पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती **(विशेष सभा)**

**कार्यपत्रिका क्रमांक – १०७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – २६/०२/२०१९** **वेळ – दुपारी ०१.३० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **विशेष** सभा **मंगळवार**, दिनांक **२६/०२/२०१९** रोजी दुपारी **०१.३०** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड – सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.अमित राजेंद्र गावडे
४. मा.गावडे राजेंद्र तानाजी
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.गीता सुशिल मंचरकर
१०. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
११. मा.बोईनवाड यशोदा प्रकाश
१२. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१३. मा.बारणे अर्चना तानाजी
१४. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त मा.पाटील - अतिरिक्त आयुक्त(१), मा.गावडे – प्र.अतिरिक्त आयुक्त(२) मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.चव्हाण - शहर अभियंता, मा.कोळंबे – मुख्य लेखा अधिकारी, मा.सवणे – प्र. सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.खोराटे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहा.आयुक्त, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.चव्हाण, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.सुपेकर, मा.देशमुख, मा.धानोरकर, मा.फुटाणे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशुवैद्यकिय अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

ठराव क्रमांक -४४९० विषय क्रमांक – ०१
दिनांक – २६/०२/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/३५/२०१९ दि.२५/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य ब, ड व ग मुख्यालयाकडील विषयांकित नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ ही दि.०५-०१-२०१९ ते दि.२९-०१-२०१९ या कालावधीमध्ये दै.लोकसत्ता व दै.इंडीयन एक्सप्रेस या वर्तमानपत्रांमध्ये देशस्तर व राज्यस्तरावर प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदांबाबत श्री.मोरेश्वर महादू भोंडवे, सन्मा. नगरसदस्य यांनी दि.३०/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ या नोटिसांमधील माझे प्रभाग क्र.१६ मधील रस्त्याचे कामासाठी धनेश्वर कन्स्ट्रक्शन व व्ही.एम. मातेरे या दोन कंपन्यांना अपात्र ठरविण्यात यावे. तसेच माझे प्रभागातील कोणतेही काम या ठेकेदारांना देऊ नये असे कळवले आहे. तथापि, विषयांकित निविदा मधील अटी व शर्तीनुसार दोन्ही ठेकेदार पात्र असून प्रभाग क्र.१६ मधील एकही काम धनेश्वर कन्स्ट्रक्शन व मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि.यांना मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच श्री.मोरेश्वर महादू भोंडवे, सन्मा. नगरसदस्य यांनी दि.१३/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या निविदा उघडल्या असुन सदर निविदांचा दर स्पर्धात्मक प्राप्त झालेला असुन सध्याचे दरापेक्षा १०.००% कमी दराने प्राप्त झालेल्या असल्याने यामध्ये कोणत्याही प्रकारची रिंग झाली नसल्याचे दिसुन येत असल्याने या निविदा रद्द करु नये असे कळवले आहे. कु.प्रज्ञा महेश खानोलकर, सन्मा. नगरसदस्या यांनी दि.३०/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये माझ्या प्रभागातील नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ निविदेतील अ.क्र.६,७,८,९, १० च्या सर्व कामांमध्ये रिंग झालेली आहे. सदर रिंगमध्ये ठराविक (मातेरे) या ठेकेदारास वरील सर्व कामे सेट केलेली आहे. याबाबतच्या ध्वनिफितीही माझ्याकडे उपलब्ध आहेत. वेळ प्रसंगी त्या मी सादर करणारच आहे. तरी, उपरोक्त निविदा रद्द करुन पुन्हा निविदा प्रक्रिया राबवावी व सदर प्रक्रिया ही पुर्णपणे पारदर्शक व्हावी असे कळवले आहे. तथापि, नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ निविदेतील अ.क्र.६,७,८,९,१० च्या सर्व कामांमध्ये मे.व्ही एम मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि. यांनी सहभाग घेतला असला तरी त्यांना एकही काम मिळालेले नाही ही वस्तुस्थीती आहे. तसेच त्यांनी पत्रात उल्लेख केले नुसारची ध्वनिफितया विभागास उपलब्ध करुन देणेबाबत कु.प्रज्ञा महेश खानोलकर, सन्मा. नगरसदस्या यांना दि.१५/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. श्री.तुषार गजानन कामठे, सन्मा. नगरसदस्य यांनी दि.०२/०१/२०१९ व दि.१२/०२/२०१९ रोजीचे पत्रान्वये नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ मधील अ.क्र.०२ च्या कामामध्ये मे.क्रिष्णाई इन्फ्रा., मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रा., मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन या तीन ठेकेदारांनी रिंग केली असुन हे काम मे.क्रिष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. हयांना देण्यात आले आहे. तरी हे टेंडर आपण पुन्हा ओपन करावे व हया तिनही ठेकेदारांना काळया यादीमध्ये टाकावे असे कळवले आहे. सदर बाबत काही पुरावे असलेस सादर करणेबाबत दि.२१/०२/२०१९ अन्वये कळवले आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो यांच्या दि.११/०२/२०१९ रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये

सदर कामाचे दुसरे पाकीट दि.११/०२/२०१९ व दि.१२/०२/२०१९ रोजी उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ क्र | निविदा क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|---|
| 1. | **77/01/2018-19** | **१) अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.**<br>२) ए आर कन्स्ट्रक्शन<br>३) श्रीगणेश कन्स्ट्रक्शन<br>४) क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>५) एच सी कटारिया | **१) 1.00% कमी**<br>२) ४.५०% जास्त<br>३) १२.००% जास्त<br>४) १५.००% जास्त<br>५) २०.००% जास्त |
| 2. | **77/0२/2018-19** | **१) क्रिष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.**<br>२)व्ही एम मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि.<br>३) धनेश्वर कन्स्ट्रक्शन | **१) 9.18% जास्त**<br>२) 10.26% जास्त<br>३) 23.23% जास्त |
| 3. | **77/03/2018-19** | **१) राधिका कन्स्ट्रक्शन**<br>२) बहिरट ब्रदर्स<br>३) मोहनलाल मथरानी कस्ट्र. प्रा.लि.<br>४) क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>५) श्रीगणेश कन्स्ट्रक्शन | **१) 7.00% कमी**<br>२) 12.00% जास्त<br>३) १4.7०% जास्त<br>४) १५.००% जास्त<br>५) 15.००% जास्त |
| 4. | **77/04/2018-19** | **१) मे.बी.के.खोसे**<br>२) अतुल आर एम सी<br>३) संकल्प इन्फ्रास्ट्रक्चर<br>४) क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>५) श्रीगणेश कन्स्ट्रक्शन | **१) 18.00% कमी**<br>२) 12.60% कमी<br>३) १2.51% कमी<br>४) १1.77% कमी<br>५) 10.2०% कमी |
| 5. | **77/05/2018-19** | **१) मे.टी.जी.धमानी**<br>२) क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>३) मे.बी.के.खोसे<br>४) मे.बहिरट ब्रदर्स<br>५) पेव्हे कन्स्ट्रक्शन | **१) 1.00% कमी**<br>२) 15.00% जास्त<br>३) १5.00% जास्त<br>४) 15.00% जास्त<br>५)दर उघडणेस अपात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | **77/06/2018-19** | **१) मे.अजवानी इन्फ्रा. प्रा.लि.**<br>२) मे.व्ही एम मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि.<br>३) मे.क्रिष्णाई इन्फ्रा. प्रा.लि.<br>४) धनेश्वर कन्स्ट्रक्शन | **१) 10.07% कमी**<br>२) 10.71% जास्त<br>३) 16.00% जास्त<br>४) 18.18% जास्त |
| 7. | **७7/७/२०१८-१९** | **१) मे.अजवानी इन्फ्रा. प्रा.लि.**<br>२) मे.व्ही एम मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि.<br>३) मे.क्रिष्णाई इन्फ्रा. प्रा.लि.<br>४) धनेश्वर कन्स्ट्रक्शन | **१) 10.12% कमी**<br>२) 10.71% जास्त<br>३) 16.00% जास्त<br>४) 23.23% जास्त |
| 8. | **७7/८/२०१८-१९** | **१) मे.अजवानी इन्फ्रा. प्रा.लि.**<br>२) मे.व्ही एम मातेरे इन्फ्रा. (इं) प्रा.लि.<br>३) धनेश्वर कन्स्ट्रक्शन<br>४) मे.क्रिष्णाई इन्फ्रा. प्रा.लि. | **१) 10.71% कमी**<br>२) 0.10% कमी<br>३) 10.00% जास्त<br>४) 12.00% जास्त |
| 9. | **७7/9/२०१८-१९** | **१) मे.पी.सी.सी.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.**<br>२)मे.बी.के.खोसे<br>3) मे.इंगावले पाटील कन्स्ट्र. कं.<br>4) क्लिन्सी कन्स्ट्र. प्रा.लि.<br>5) धनेश्वर कन्स्ट्र.<br>६) श्रीगणेश कन्स्ट्रक्शन | **१) 19.00% कमी**<br>२) 18.00% कमी<br>३) 17.10% कमी<br>४) 16.99% कमी<br>५) 3.10% जास्त<br>६) 15.00% जास्त |
| 10. | **77/10/2018-19** | **१) मे.बी.के.खोसे**<br>२) क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि.<br>३) पेव्हे कन्स्ट्रक्शन<br>४) मे.बहिरट ब्रदर्स<br>५) मे.टी.जी.धमानी | **१) 2.50% जास्त**<br>२) 12.99% जास्त<br>३) १5.00% जास्त<br>४) 15.00% जास्त<br>५) 15.02% जास्त |

श्री.विलासभाऊ हनुमंतराव मडिगेरी, सन्मा.नगरसेवक यांनी दि.१६/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा.आयुक्त सो यांचेशी झालेल्या चर्चेनुसार दहा कंत्राटाबाबत जे आरोप-प्रत्यारोप झालेले होते व तुषार कामठे आणि मयुर कलाटे यांनी लेखी स्वरुपात तक्रार केली होती त्या निविदा उघडणेबाबत आयुक्त साहेबांना विनंती केली होती. त्यानुसार या निविदा उघडल्यानंतर तक्रारीनंतर

त्याच्यामध्ये दोष आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कायदेशीर कारवाई आयुक्त साहेबांनी करावी. नियमानुसार त्यांच्यावर फौजदारी कारवाई सुध्दा करावी आणि पुढील काळामध्ये त्यांच्यावरती चौकशी लावुन चौकशी पुर्ण होईपर्यंत अशा ठेकेदाराला कोणत्याही कामाचा आदेश देऊ नये असे कळवले आहे. तथापि, सदर पत्रामध्ये उल्लेख केलेल्या कामास उपरोक्त तक्त्या प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत. सदर प्रकरणी नि.नो.क्र.७७/१०/२०१८-१९ मधील एकुण १ ते १० कामांच्या निविदा ज्या ठेकेदारांनी भरल्या आहेत त्या सर्व ठेकेदारांकडुन खुलासा मागविण्यात आला आहे. प्राप्त खुलासांप्रमाणे बहुतेक सर्व ठेकेदरांनी सदरची निविदा नोटीस ही ई-निविदा असुन ती संगणकीय पध्दतीने भरावयाची असल्याने व सदरची निविदा ही संपुर्ण भारतातुन कोठुनही भरता येत असल्याचे नमुद केले आहे व त्याप्रमाणे सदर निविदा भरताना त्यांनी संगनमत केल्याचे नाकरले आहे. त्याचप्रमाणे या निविदा भरण्यासाठी वापरण्यात आलेल्या संगणकाचे IP Address mahatender.gov.in या वेबसाईटवरुन तपासणेत आलेले असुन त्यामध्ये कोणत्याही कामासाठी निविदा भरलेल्या ठेकेदारांच्या संगणकाच्या IP Address मध्ये साम्य आढळुन आलेले नाही. विषयांकित निविदा नोटीसीमधील कामांबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे फेरनिविदा काढणेबाबत निर्णय झालेस पुनश्च: असे दर प्राप्त होतीलच याची शाश्वती नाही. प्राप्त निविदामध्ये फक्त अ.क्र.०२ व १० या कामांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर प्राप्त आहेत. उर्वरित सर्व कामाचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दर प्राप्त झाले आहेत. त्यामुळे अ.क्र.०२ व १० या कामांना दर कमी करणेबाबत विचारणा करणेत येईल तसेच सध्या प्राप्त दरापेक्षा जादा दर प्राप्त झालेस याबाबत भविष्यात लेखापरिक्षणामध्ये आक्षेप उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही व मनपाचे आर्थिक नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित होवु शकते.तसेच मनपामध्ये अशा प्रकारची कामे करणारे सुमारे १५-२० ठेकेदार आहेत. तथापि, आम्हाला निविदा भरणेस प्रतिबंध केला किंवा दबाव आणला अशी एकही तक्रार मनपाकडे प्राप्त नाही. त्यामुळे यामध्ये ठेकेदारांनी संगनमत (रिंग) करुन निविदा भरली असे सिध्द करता येत नाही. उपरोक्त प्रमाणे सर्व कामांबाबतची वस्तुस्थिती आहे. संपुर्ण निविदा प्रक्रिया ही विहित नियमानुसार पार पाडणेत आलेली आहे. सर्व निविदांबाबत स्पर्धा झाल्याचे आढळुन येते. महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दती प्रमाणे या निविदाधारकांना दर कमी करणेबाबत विचारणा करुन दर कमी करुन घेऊन निविदेची पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल असे इकडील मत आहे. सबब, उपरोक्त प्रमाणे वस्तुस्थिती आहे. तरी, सदरच्या अहवालाचे अवलोकन करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/४२७/२०१९
दिनांक – २६/०२/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडेपुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.